**<u>ठळक बातम्या</u>**

- वक्फ सुधारणा विधेयक आज राज्यसभेत सादर/ विधेयक लोकसभेत काल २८८ विरुद्ध २३२ मताधिक्यानं मंजूर

- सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांच्या मालमत्तेची माहिती संकेतस्थळावर जाहीर होणार

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सहाव्या बिमस्टेक शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी थायलंडमधल्या बँकॉक इथे पोहोचले

**आणि**

- राज्याच्या अनेक भागात अवकाळी पावसाची हजेरी

**<><><><><>**

काँग्रेस अध्यक्ष आणि खासदार मल्लिकार्जुन खरगे यांच्यावर भाजपा खासदार अनुराग ठाकूर यांनी काल लोकसभेत जमीन हडपल्याचा आरोप केला होता. या निषेधार्थ आज विरोधी सदस्यांनी राज्यसभेतून सभात्याग केला. अनुराग ठाकूर यांनी माफी मागावी, अशी मागणी यावेळी त्यांनी केली. राज्यसभेत अशा प्रकारे कोणाचीही प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये अशी अपेक्षा राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांनी यावेळी व्यक्त केली. त्यांनी आचारसंहिता समितीला या संदर्भात निश्चित पद्धती निर्माण करावी असं आवाहनही केले. सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकलेले मुद्दे संघर्षाचे कारण होऊ नये, असंही ते म्हणाले. त्यानंतर विरोधी पक्ष सदस्यानी सभात्याग केला.

दरम्यान देशात अल्पसंख्यांकांवर झालेल्या हल्ल्यांच्या निषेधार्थ काँग्रेसचे केरळमधील खासदार आणि इतर विरोधी सदस्यांनी लोकसभेतूनही सभात्याग केला.

**<><><><><>**

लोकसभेत काल रात्री उशिरा वक्फ सुधारणा विधेयक २०२५ मंजूर करण्यात आलं. विधेयकाच्या बाजूनं २८८ सदस्यांनी मतदान केलं, तर २३२ सदस्यांनी विरोधात मतदान केलं. रात्री उशिरापर्यंत विधेयकावर चर्चा झाल्यानंतर मतदान घेण्यात आलं.

वक्फच्या मालमत्तांच्या व्यवस्थापनाचं सुसूत्रीकरण करण्याबरोबरच वारसास्थळांची सुरक्षा आणि सामाजिक कल्याणाला प्रोत्साहन देणं हा वक्फ सुधारणा विधेयक २०२५ चा उद्देश आहे. मालमत्तांच्या व्यवस्थापनामध्ये पारदर्शकता वाढवणं, वक्फ मंडळं आणि स्थानिक अधिकारी यांच्यामध्ये समन्वय वाढवणं आणि सर्व संबंधितांच्या हक्कांचं रक्षण करणं यावरही या विधेयकात भर आहे. वक्फ मंडळांना अधिक सर्वसमावेशक बनवणं, वक्फच्या सुशासनासाठी आणि निर्णयांसाठी मुस्लिम समाजातील सर्व पंथांना प्रतिनिधीत्व देणं हा विधेयकाचा उद्देश आहे. यापूर्वी, संयुक्त संसदीय समितीनं अहवाल दिल्यानुसार लोकसभेत वक्फ (सुधारणा) विधेयकावर चर्चा झाली. भारत हा अल्पसंख्याक समुदायासाठी सर्वात सुरक्षित देश आहे,  या विधेयकाचा मुस्लिमांच्या धार्मिक प्रथांशी काहीही संबंध नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं.

विरोधकांना उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, मंत्रिमंडळानं मंजूर केलेल्या संयुक्त संसदीय समितीनं सविस्तर चर्चा केल्यानंतर हे विधेयक आणलं आहे. वक्फ मंडळांमध्ये कोणतेही मुस्लिमेतर सदस्य नसतील, असं त्यांनी स्पष्ट केलं. अल्पसंख्याकांमध्ये भीती पसरवण्यासाठी आणि आपली मतं सुरक्षित राखण्यासाठी या विधेयकाबाबत अपप्रचार केला जात आहे, असंही ते म्हणाले. चर्चेला सुरुवात करताना, काँग्रेसचे गौरव गोगोई यांनी सरकारवर या विधेयकाद्वारे लोकांची दिशाभूल करण्याचा आरोप केला. ते म्हणाले की, हे विधेयक

संविधानाविरोधी आहे. या कायद्यातील सुधारणांमुळे अधिक समस्या निर्माण होतील, अशी टीका त्यांनी केली.

**<><><><><>**

भारतीय लोकशाहीचं सर्वसमावेशक स्वरूप दर्शवणारं राज्यसभा हे संसदेचं स्थायी सभागृह असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. आज राज्यसभा दिनानिमित्त ते सभागृहात बोलत होते…

**होल्ड - बाईट- धनखड……**

१९५२ मधे ३ एप्रिल रोजी राज्यसभा अस्तित्वात आली.

**<><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयकावर राज्यसभेत चर्चा सुरू आहे. संयुक्त संसदीय समितीत सखोल चर्चा केल्यानंतरच हे विधेयक आणण्यात आल्याचं अल्पसंख्यक कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी विधेयक मांडताना सांगितलं. वक्फच्या मालमत्तेत मुस्लिमेतर व्यक्ती हस्तक्षेप करणार नाही, याचा लाभ केवळ मुस्लिम व्यक्तींनाच मिळेल, असं रिजीजू यांनी स्पष्ट केलं. या विधेयकाचा हेतू वक्फ मालमत्तांचं व्यवस्थापन करणं असून मुस्लिमांच्या धार्माचरणात हस्तक्षेप करण्याचा नाही असंही त्यांनी सांगितलं.

वक्फ सुधारणा विधेयक आणून सरकार समाजात विभाजन करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप काँग्रेस खासदार सय्यद नासेर हुसैन यांनी केला. हे विधेयक चुकीच्या माहितीच्या आधारे बनवलं गेल्याचं हुसैन म्हणाले. संयुक्त संसदीय समितीत बहुसंख्य सदस्यांनी विधेयकाला विरोध केला होता. त्यामुळे सरकारने वक्फशी संबंध नसणाऱ्या लोकांना समितीत चर्चेसाठी बोलावलं गेलं असा आरोपही त्यांनी सरकारवर केला.

**<><><><><>**

न्यायव्यवस्थेवरचा जनतेचा विश्वास वाढावा तसंच त्यात पारदर्शकता यावी यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांनी त्यांच्या मालमत्तेची माहिती सार्वजनिकरित्या उपलब्ध करून देण्यासाठी सहमती दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांची बैठक १ एप्रिल रोजी झाली, या बैठकीत सर्व न्यायाधीशांनी हा निर्णय घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर याची घोषणा केली जाणार आहे. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरी रोकड सापडल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सहाव्या बिमस्टेक शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी थायलंडमधल्या बँकॉक इथे पोहोचले. विमानतळावर थायलंडचे उपप्रधानमंत्री सूर्या जुआनग्रुआंकित यांनी मोदी यांचं स्वागत केलं. थायलंडमधला भारतीय समुदायही प्रधानमंत्र्यांच्या स्वागतासाठी मोठ्या संख्येनं आला होता. त्यानंतर मोदी यांच्या स्वागतार्थ भरतनाट्यम आणि थायलंडच्या शास्त्रीय नृत्यशैलीचा मिलाफ दाखवणारा कार्यक्रम सादर करण्यात आला.

या दौऱ्यात प्रधानमंत्री मोदी आज संध्याकाळी थायलंडच्या प्रधानमंत्री पेतोंगटार्न शिनावात्रा यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करून दोन्ही देशांमधल्या संबंधांचा आढावा घेतील. या दरम्यान ते द्विपक्षीय करारांवरही स्वाक्षरी करतील. सहाव्या बिमस्टेक शिखर परिषदेसाठी ते उद्या उपस्थित राहणार आहेत. या शिखर परिषदेत अनेक करार आणि घोषणा होण्याची शक्यता आहे. ही परिषद आटोपून मोदी उद्या तीन दिवसांच्या श्रीलंकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत.

**<><><><><>**

भविष्य निर्वाह निधीच्या खातेदाराला वारसाचं अद्ययावतीकरण करण्यासाठी शुल्क द्यावं लागू नये यासाठी अर्थमंत्रालयाने सरकारी बचत  प्रोत्साहन कायदा २०१८

मधे बदल केले आहेत. याची अधिसूचना काल जारी झाल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

**<><><><><>**

५७व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राचे पुरुष आणि महिला संघ उपांत्य फेरीत पोहोचले आहेत. ओदिशात पुरी इथं आयोजित या स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरुष संघाने उपान्त्यपूर्व फेरीत पश्चिम बंगालचा पराभव केला तर महिला संघाने कोल्हापूर संघाचा पराभव केला. उपान्त्य फेरीत पुरुष संघाचा सामना ओडिशाविरुद्ध होणार आहे तर महिला संघाची गाठ दिल्ली संघाबरोबर पडेल.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत कोलकाता नाईट रायडर्सचा सामना आज सनरायजर्स हैदराबादशी होणार आहे. हा सामना कोलकात्याच्या इडन गार्डन्स स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होईल.

**<><><><><>**

राज्यातल्या अनेक भागात काल अवकाळी पाऊस झाला. रत्नागिरीत आज पहाटे अनेक ठिकाणी वीजांसह सुमारे तासभराहून अधिक काळ जोरदार पाऊस पडला. या पावसामुळे उकाड्यातून दिलासा मिळाला असला, तरी आंबा-काजूसारख्या पिकांसाठी तो नुकसानकारक ठरणार आहे.

**धुळे** जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. नेर गावासह परिसरात गारपीटीमुळे पिकांचं मोठं नुकसान झालं आहे.

**नाशिक** जिल्ह्यातल्या अनेक गावात गारपीट, वादळी वाऱ्यासह पावसानं जोरदार हजेरी लावली. वादळी वारे आणि पावसामुळं काढणीस आलेल्या आणि शेतात काढून ठेवलेल्या कांद्यासह अन्य पिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं.

**भंडारा** जिल्ह्यात आज सकाळपासून वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस होत आहे. तुमसर तालुक्यातल्या पाथरी इथं वीज पडून दोन मजुरांचा मृत्यू झाला आहे.

**नागपूर** जिल्ह्यात आज सकाळपासून वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. पावसामुळे शहरात अनेक ठिकाणी झाडांची पडझड झाली आहे.

पुढचे दोन-तीन दिवस राज्यात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**